# पर्येतील गोवा राज्य सहकारी बँकेच्या आर्थिक समावेशन मोहिमेला प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**केरी सत्तरी :** गोवा राज्य सहकारी बँक पर्ये शाखेतर्फे नुकतेच ग्रामपंचायत सभागृह पर्ये येथे आर्थिक समावेशन मोहिमेचे आयोजन केले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया गोवा व महाराष्ट्राचे बँकिंग लोकपाल प्रमुख महाव्यवस्थापक संजीव कुमार होते. यावेळी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे प्रादेशिक संचालक प्रभाकर झा, उपमहाव्यवस्थापक सँड्रा रॉड्रिग्स, नाबार्डचे उपमहाव्यवस्थापक विश्वास कदम, पर्येच्या सरपंच दीपा नाईक व गोवा स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्यवस्थापकीय संचालक अनंत चोडणकर यांची उपस्थिती होती.

सुरुवात पारंपरिक दीपप्रज्वलनाने झाली. अनंत चोडणकर यांनी उपस्थितांचे स्वागत करून मोहिमेचे उद्दिष्ट स्पष्ट केले. सुनील मडकईकर यांनी प्रधानमंत्री जनधन योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना व अटल पेन्शन योजना याबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच री-केवायसीचे महत्त्व स्पष्ट केले.



आर्थिक समावेशन मोहिमेला उपस्थित खातेधारक व लोक.

कायदा अधिकारी श्रुती लोलयेकर यांनी तक्रार निवारण व नामनिर्देशन प्रक्रियेवर मार्गदर्शन केले. विश्वास कदम यांनी नाबार्डच्या विविध योजना व अशा शिबिरांचे महत्त्व अधोरेखित केले. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे प्रादेशिक संचालक प्रभाकर झा यांनी केवायसी अद्ययावत करण्याचे व निष्क्रिय खाती सक्रिय करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमादरम्यान रिझर्व्ह बँक ऑफ इंडियातर्फे दीपा नाईक यांना विशेष गौरवचिन्ह प्रदान करण्यात आले. या मोहिमेत १७० खातेदारांनी री-केवायसीसाठी कागदपत्रे सादर केली तर ५५ नवीन पीएमएसबीवाय व २३ पीएमजेजेबीवाय खाती उघडण्यात आली.